Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P070

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

# गोंड आदिवासींच्या रूढी, परंपरा आणि आधुनिकतेशी संघर्ष

**रुची अनिलराव बोरकर**
संशोधन अधिछात्रा
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ,
नागपूर

**गोषवारा**

भारतात आदिवासी समाजाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतीय संस्कृतीचा पाया जितका प्राचीन आहे तितका इतिहास जुना आहे. गोंड आदिवासी समाज मध्य भारतातील सर्वात मोठा आणि प्राचीन समाज मानला जातो. त्यांच्या रूढी परंपरा, श्रद्धा, लोककला, सण, उत्सव आणि सामुदायिक जीवन पद्धती यातून त्यांच्या समृद्ध संस्कृतिक वारसा यांचे दर्शन घडते. गोंड आदिवासी समाजाचे जीवन निसर्गाशी घट्टपणे जोडलेले असून त्यांच्या रूढी, परंपरा या देवदेता आणि श्रद्धा यावर आधारित असून निसर्ग पूजक आहेत. परंतु आधुनिक काळात शहरीकरण, औद्योगीकरण, संस्कृतीकरण, शिक्षण आणि तंत्रज्ञांचा प्रसारामुळे गोंड समाजाच्या परंपरेत जीवनशैलीत मोठ्या प्रमाणावर बदल होत आहे. या बदलांमुळे त्यांच्या पारंपरिक रूढी आणि परंपरा टिकवून ठेवण्याचा व आधुनिक समाजाच्या जुळवून घेण्याची संघर्ष निर्माण झालेला आहे. या बद्लांमुळे काही परपरांचे  पुनर्जीवन करण्याचे प्रयत्न दिसून येत आहे. या संशोधनांमध्ये गोंड आदिवासींशी संबंधित सामाजिक, धार्मिक आणि संस्थेचे प्रश्न चा अभ्यास केला असून आधुनिकतेच्या प्रभावामुळे घडणाऱ्या सामाजिक आणि सांस्कृतिक बदलांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. या अध्ययनातून गोंड समाजाच्या संस्कृतीतील सातत्य परिवर्तन आणि संघर्ष तिन्ही पैलूंचा विश्लेषण केले जाईल.

गोंड आदिवासीं समाजाच्या पारंपरिक मूल्यांचे संरक्षण आधुनिकतेचे समन्वय साधण्यासाठी त्यांच्या प्रयत्नांची ओळख आणि समाजातील सांस्कृतिक ओळखीचे महत्त्व स्पष्ट करते अशा प्रकारे हे संशोधन आदिवासी समाजशास्त्र, सांस्कृतिक अध्ययन आणि आधुनिकता या प्रक्रियेतून स्पष्ट केले आहे.

**बीजशब्द**

गोंड आदिवासी समाजातील रूढी, परंपरा, आधुनिकता, संघर्ष आणि समन्वय साधण्यासाठी विकासात्मक प्रयत्न.

**प्रस्तावना**

आधुनिकतेशी संघर्ष म्हणजे परंपरा आणि आधुनिक जीवनशैलीदरम्यान निर्माण होणारा तणाव, ज्याचा प्रभाव सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक स्तरांवर दिसतो. आधुनिक तंत्रज्ञान, औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि जागतिकीकरणामुळे पारंपारिक मूल्ये, जीवनपद्धती आणि सामाजिक संरचना बदलण्यास भाग पडतात. हे बदल व्यक्ती आणि समाज यांच्यामध्ये सतत असंतुलन निर्माण करतात, ज्यामुळे कौटुंबिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये तणाव दिसतो.

रूढी म्हणजे एखाद्या समाजाने काळानुसार स्वीकारलेले नियमित पद्धतीने केलेले वर्तन सण, विधी किंवा नियम होय. या रूढी लोकांच्या दैनंदिन जीवनात नियमितपणे वापरले जातात आणि बहुधा धार्मिक, सामाजिक किंवा सांस्कृतिक कारणावर आधारित असतात. उदा. काही समाजामध्ये नवीन वर्षाच्या दिवशी जमिनीवर पूजा करणे किंवा विवाहाच्या ठराविक विधी पार पाडणे ही रुढी मानली जाते. रुढी समाजाच्या दैनंदिन जीवनाशी दिशा ठरवतात आणि लोकांमध्ये सामाजिक समन्वय टिकवण्याचे कार्य करतात. परंतु आधुनिक तंत्रज्ञान आणि बदलत्या जीवनशैलीमुळे या परंपरा अनेकदा कमी प्रमाणात पालन केल्या जातात किंवा त्यात बदल होतो ज्यामुळे समाजात संतुलन राखणे कठीण होत आहे.

परंपरा म्हणजे समाजाने अनेक पिढ्यांपासून जपलेली सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक किंवा ऐतिहासिक प्रथा होय. परंपरा समाजाची ओळख, मूल्ये आणि संस्कृती टिकवण्याचे कार्य करते. उदा. गोंड आदिवासी समाजामध्ये नवाखाई साजरे करणे,(नवीन तांदूळ घेतात सर्व लोक त्यांची पूजा करतात त्यानंतर वापर करतात). ही परंपरा अनेक पिढ्यांपासून चालत आलेली परंपरा आहे, जी समाजाच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाशी जोडलेली आहे. परंपरा समाजाच्या मोठ्या समूहाशी संबंधित असून दीर्घकाळ टिकते, त्यामुळे ती सामाजिक समन्वय आणि सांस्कृतिक ओळख टिकवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. तथापि, आधुनिक जीवनशैली, शिक्षण आणि जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे या परंपरेला टिकवणे आणि पुढील पिढीकडे हस्तांतरित करणे आव्हानात्मक ठरते.

भारतात या आदिवासी समूहापैकी गोंड आदिवासी समाजाची सर्वाधिक लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आढळतात. जसे महाराष्ट्रात मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओडिशा आणि आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये गोड समाजाची वस्ती मोठ्या प्रमाणात आढळते. तसेच या प्रदेशाला पूर्वी गोंडवाना प्रदेश म्हणत होते. गोंड आदिवासी समाज हा प्राचीन काळात स्वतंत्र आणि संघटित होता. "गोंड" हा शब्द द्रविड भाषेतील कोंड या शब्दापासून आला आहे ज्यांचा अर्थ "डोंगरमध्ये राहणारे लोक" असा सुद्धा होतो. गोंड आदिवासी लोकांची जीवनशैली शेती, शिकार, मासे मारणे, जंगलातील फळे, फुले गोळा करणे हे होते.

गोंड आदिवासी समाज कुळपद्धतीवर आधारित होता. प्रत्येक कुळाला आपला टोटम असतो. उदा. एखादा प्राणी, पक्षी किंवा झाड असते. तसेच त्यांची विवाह पद्धती संगीत, नृत्य आणि भोजनाद्वारे साजरी केली जात होती तसेच विभिन्न कुळामध्ये विवाह करत होते. गोंडी लोकांची स्वतःची भाषा गोंडी आहे. जी द्रविड भाषा समूहातील मानली जाते अनेक गोंड आदिवासी लोक एका जागेवरून दुसऱ्या जागेवरील स्थलांतरित होतात कारण ते स्थानिक भाषा बोलतात. गोंड

आदिवासींच्या रूढी, परंपरा यामध्ये होणारा बदल शिक्षण आरोग्य रोजगार क्षेत्रात प्रगती होऊन निसर्गाशी एकरूप होऊन जगणारा हा गोंड आदिवासी समाज पारंपरिक मूल्य आणि आधुनिकतेचा समतोल राखण्याचा प्रयत्न करीत आहे.

**ऑगबर्न (१९२२)** यांच्या मतानुसार सामाजिक बदल व आधुनिकतेचा प्रभाव पारंपरिक मूल्यांवर दबाव आणतो, ज्यामुळे मूल्यसंघर्ष निर्माण होतो. त्यामुळे आधुनिकतेशी संघर्ष हा समाजातील सर्व स्तरांवर मोठ्या प्रमाणात दिसतो आणि सतत समायोजनासाठी प्रयत्नांची आवश्यकता निर्माण करतो.

**थोर्स्टेन वेबलेन पार्क & बर्गेस (१९३०)** यांच्या संस्कृती संघर्ष सिद्धांतानुसार दोन भिन्न संस्कृती एकत्र आल्यावर मूल्य संघर्ष निर्माण होतो. म्हणजेच आधुनिक समाजाच्या व्यक्ती वाद आणि आधुनिक समाजातील सामायिकता यामध्ये संघर्ष निर्माण होतो. गोंड आदिवासी समाजातील रुढी आणि परंपरांचा विचार केल्यास गोंड आदिवासी समाजातील पारंपारिक देवपूजा, लोकनृत्य आणि सामाजिक विवाह, आधुनिक शिक्षण, शहरी संस्कृतीच्या दबावाखाली बदलत आहे.

**ब्रिटिश मानसशास्त्रज्ञ व्हेरियर एल्विन (१९५५)** यांच्या स्वतंत्र संस्कृती सिद्धांतामध्ये यांनी गोंड आणि इतर माध्यमातून भारतीय आदिवासी समाजाचे अध्ययन केले असून आदिवासी समाज हा स्वतंत्र सांस्कृतिक घटक आहे. त्यांची विशिष्ट ओळख असून जबरदस्तीने बदलण्यास प्रवृत्त करू नये तसेच आधुनिक समाजात विलय करू नये तसेच दोन आदिवासी समाज हा निसर्ग आहे त्यांच्या संस्कृती मूल्यदिष्टीत आहे आणि त्या बाह्य प्रभाव टाळणे आवश्यक आहे हा सिद्धांत परंपरा जपावी पण विकास व्हावा या संतुलित दृष्टिकोनाकडे निर्देश करतो.

**भारतीय समाज शास्त्रज्ञ जी.एस. धुर्ये "संस्कृती एकात्मता सिद्धांत" (१९६३)** मध्ये यांनी आदिवासी समाजाला प्रत्येक नव्हे तर भारतीय संस्कृतीचा भाग असे मानले आहे आदिवासी अल्प विकसित हिंदू समाजाचे घटक आहेत त्यांचा विकास मुख्य प्रवासी तत्त्वांनी साधला पाहिजे ज्यामुळे गौण समाजाने आधुनिकतेचा स्वीकार करून सामाजिक शैक्षणिक आणि आर्थिक विकासाच्या प्रवास सहभागीय होऊन परंपरेपेक्षा प्रगतीला प्राधान्य देणे आवश्यक आहे.

**अँकलेस, स्मिथ & रोस्टो (१९७४)** यांच्या आधुनिकीकरणाचा सिद्धांतामध्ये समाज पारंपारिक अवस्थेकडून आधुनिक अवस्थेकडे विशिष्ट टप्प्याटप्प्यातून प्रवास करत आहे. ज्यामुळे शिक्षण आणि औद्योगीकरणामुळे आर्थिक बदल होतात पण सांस्कृतिक मूल्य हळूहळू बदलत आहे.

**योगेंद्र सिंग (१९८६)** यांच्या सामाजिक परिवर्तन आधुनिकतेचा सिद्धांतानुसार परंपरा व आधुनिकतेचा संबंध स्पष्ट करताना भारतीय समाज पूर्णपणे आधुनिक होत नाही. तर परंपरा आणि आधुनिकता यांचा संमिश्र विकास होतो. गोंड आदिवासी समाजाच्या संदर्भामध्ये आधुनिक शिक्षण शासनव्यवस्था आणि रोजगार क्षेत्रातील सहभाग वाढला असला तरी त्यांच्या पारंपारिक श्रद्धा, सण आणि रूढी टिकून आहे. म्हणजेच दोन्ही घटकात संघर्ष असूनही समायोजनात्मक प्रक्रिया घडते.

**स्टुअर्ट हॉल (१९९०)** मध्ये संस्कृतीची ओळख या सिद्धांतानुसार आधुनिक मूल्ये स्वीकारताना सांस्कृतिक ओळख टिकवण्याचा संघर्ष विशेषतः मोठ्या प्रमाणावर जाणवतो.

**व्ही.यु. सोनवणे / एन. एस. लक्ष्मण "संवर्धनवादी दृष्टिकोन" (१९९८)** मध्ये यांनी गोंड आदिवासींच्या समाजाच्या लोक परंपरा लोककला आणि श्रद्धा या जगतानाच्या दृष्टीने दृष्टीने अभ्यास केले आहे विकासासाठी आधुनिक शिक्षण आणि तंत्रज्ञान आवश्यक असले तरी परंपरागज्ञान आणि लोकसंस्कृती हे गुण समाजाच्या अस्तित्वाचे मूलभूत आधार आहे गोंड आदिवासी समाज संवर्धनासाठी दृष्टिकोन हा विकास आणि परंपरेच्या संतुलन राखने आवश्यक आहे

## पूर्व संशोधन आढावा.

"Role of Imbuing Interaction on the Social Fabric of Gond Tribe" २०२४ या संशोधनांमध्ये Malik Garima & Sethi Sabina यांनी गोंड आदिवासी समाजाच्या सामाजिक रचनेचा आणि इतर समाजाशी असलेला संपर्काच्या अध्ययन केले असून Journal of Visual and Performing Arts, खंड ४, अंक २ यामध्ये प्रकाशित केले आहे. गोंड आदिवासी समाजातील पारंपरिक नियम नातेगोते संबंध आणि धार्मिक परंपरा यांचा समाजजीवनावर होणारा परिणाम दिसून येते ज्यामध्ये शिक्षण आर्थिक विकासाचा वाढत्या प्रवाहामुळे शिक्षणाचा विकास भासत आहे. त्याद्वारे शिक्षणाचे वाढते प्रमाण महिलांसाठी अतिशय महत्त्वाचे आहे. अनेक आदिवासी लोक शेती विकून भूमीवर मजूर बनत आहे काही आदिवासी लोकांकडे अजूनही शेती नाही आपले उत्पादित व्यवसाय रोजगार करत आहेत. ज्यामुळे आधुनिक शिक्षण रोजगार आणि शहरीकरणामुळे मूळ आदिवासी समाजाच्या पारंपारिक मूल्य व्यवस्थेत बदल होत आहे. आदिवासी प्रभाव गोंड आदिवासीं समाजाच्या पारंपारिक जीवनशैलीशी रूढी परंपरांमध्ये बदल घडवून आणत आहे. या बदलांमुळे नवीन संधी निर्माण झाले आहे या बदलांमुळे आधुनिक जीवनाशी यांच्याशी संतुलन राखणे मोठा सामाजिक सांस्कृतिक संघर्ष आहे. ज्यात गोंड आदिवासी समाजाची पारंपारिक संस्कृती आणि आधुनिक जीवनशैली यांच्यात समन्वय साधण्यासाठी त्यांचा मेळ घालने, शिक्षण आणि आरोग्य सेवांमध्ये सुधारणा करणे आणि संधी उपलब्ध करून देणे त्यांचा आर्थिक विकास होणे आवश्यक आहे तसेच गोंड आदिवासींचे समाजात सामाजिक एक्य आणि परंपरेतील निष्ठा अजूनही दृढ आहे. त्यामुळे सामाजिक रचना आणि पारंपारिक मूल्यांमध्ये गोंड आदिवासी समाजाची ओळख आणि आधुनिक संघर्ष यात संतुलन राखणे काळाची गरज आहे.

"Gond Tribe Community: Exploring Cultural, Heritage and Socio-Economic Perspective" २०२४ या संशोधनामध्ये Dhurve Sangeeta यांनी Redishine Archive Journal प्रकाशित केले आहे. हा पेपर गोंड आदिवासी समाजातील पाळल्या जाणाऱ्या विविध रूढी, परंपरा आणि सांस्कृतिक वारशाचे तसेच आर्थिक परिस्थितीचे परीक्षण करते. त्यामुळे समाजातील नियम मूल्य आणि शासन पद्धतीचे सामाजिककरण केले जाते. ज्यात गोंड आदिवासी संस्कृतीचे संरक्षण करणे आणि त्यांना टिकून ठेवणे. मोठ्या आव्हानांना तोंड द्यावे लागते.

गोंड आदिवासीं समाजातील लोककला दोन्ही भाषा लोक श्रद्धा तसेच वन आधारित अर्थव्यवस्था आधुनिकरणाचा लोककलांवर संकट आले आहे. आजही यासाठी काही आर्थिक आणि शैक्षणिक प्रगतीसाठी एकाच स्थानावरूमन दुसऱ्या स्थानावर स्थलांतर होत आहे. वाढत्या आधुनिकीकरणाचा बदलत्या स्वरूपाची विश्लेषण अतिशय महत्त्वाचे झाले आहे. कारण काही आदिवासी लोकांनी आपली संस्कृती तसेच आपल्या लोककला शेती उत्पादित व्यवसाय जतन करून ठेवले परंतु काहीं गोंड आदिवासीं लोकांना कठीण संघर्ष करावा लागतो.

आधुनिकरणामुळे गोंड आदिवासी लोकांना स्वतःची विशिष्ट सांस्कृतिक ओळख बदलण्यास प्रवृत केले आहे. बाह्य प्रभावामुळे त्यांच्या जीवनशैली आहाराच्या सवयी आणि धार्मिक परंपरांमध्ये बदल होत आहे तसेच उदारनिव्हाचे साधन व्यवसाय जीवनशैलीवर संकट आजही दिसून येते आधुनिकतेच्या प्रभावामुळे पारंपरिक व्यवसाय पोषक जीवनशैलीत झालेल्या बदल स्वीकार करतांना गोड आदिवासी समाजाने आपली सांस्कृतिक ओळख जतन करण्यासाठी आणि त्यांना आवश्यक विकासाच्या मुख्यप्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. गोंड आदिवासीं संस्कृतीचे मूळ तत्वे आणि लोककला जतन राहिल्या आणि विकास साध्य होईल.

**उद्दिष्टे**

1. गोंड आदिवासी समाजाच्या रूढी परंपरांच्या अध्ययन करणे.
2. आधुनिकीकरणामुळे गोंड आदिवासी समाजाच्या संस्थेवर झालेल्या परिणामांचा शोध घेणे.
3. गोंड आदिवासी समाजाच्या परंपरागत रूढी परंपरा व आधुनिकतेच्या संघर्षाने नवीन पैलूंचा अध्ययन करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम सामग्री वर अवलंबून असून विविध पुस्तके, जर्नल्स, संशोधन लेख, सदर संशोधनाकरीता वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. गोंड आदिवासीच्या रूढी परंपरा आणि आधुनिकतेशी संघर्ष यांचा अभ्यास केला असून त्यांच्या पूर्वी आणि आताच्या बदलत्या परिस्थितीचा शोध घेतले आहे.

**परिणाम आणि चर्चा**

या संशोधनातून भारतात गोंड आदिवासी समाज हा महत्वपूर्ण आहे. त्यांच्या रूढी, प्रथा, परंपरा व धार्मिक विचारांवर आधारलेला होते. गोंड आदिवासीं समाजातील धर्माचे दर्शन त्यांचे देव, उत्सव, लोकगीते आणि लोककथा यांच्यातून होते. गोंड आदिवासीं लोकांची देवावर फार श्रध्दा होती. गोंडी भाषेत देव शब्दासाठी 'पेन' हा शब्द रूढ होता. देवतांची पूजापद्धती अतिशय काटेकोरपणे केली जात होती. देवतांची पूजा करण्यासाठी प्रत्येक गावात किंवा काही गावांचे मिळून भुमका, पेरमा, पुजारी इ. व्यक्ती होते. या व्यक्तीच्या मार्फत गोंड जमातीचे लोक वेगवेगळ्या देवतापूजा करीत होते. त्याचे देव निसर्गात होते. गोंड लोकांच्या परंपरेत, अनुयायी बारादेव नावाच्या एका उच्च नावाच्या एका उच्च देवतांची पूजा करतात. ज्यांची पर्यायी नावे भगवान, कूपर, लिंगो, बढादेव आणि परसापेन आहेत. बारादेव कुळ आणि ग्रामदेवता तसेच पूर्वजांसारखा लहान देवांच्या कार्यावर देखरेख करत होते. पूर्वजांची पूजा पूर्वजांचा आदर करणे आणि त्यांची पूजा करणे ही एक महत्त्वाची प्रथा परंपरा आहे. त्यास ते सृष्टी निर्माता मानित होते. गोंड आदिवासीं जमातीचे सण, सभारंभ आणि धार्मिक विधी त्यांच्या समृद्ध वारशाच्या भाग आहे.

वर्धा आणि पूर्णा खोऱ्यात जमातीतील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. त्यांची जीवनशैली शेतीच होती पारंपारिक पद्धतीने ते झूम शेती करत होते. (कापून जाऊन ते शेती करत होते) ज्यात शेतीसाठी वारंवार जागा बदलत होते. गोंड आदिवासीं जमातीचे मुख्य अन्न म्हणजे कोडो किंवा कुटकी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दोन बाजारी ते सणाच्या वेळी त्यांच्या जेवणात भाताच्या समावेश करत होते आणि बहुतेक लोकसंख्या मासाचे ग्राहक होते.

गोंड आदिवासींची संस्कृती ही पारंपारिक कुटीर उद्योग पद्धतीने भोवती फिरत होती जसे की फरशी, रंगवणे, मातीची भांडी आणि टोपल्या विणणे, गोंड आदिवासींची पुरुष दगडी बांधकाम आणि लाकूडकाम देखील करतात. खांबावर, स्मारकांवर आणि राजवाड्यामध्ये आणि धार्मिक स्थळांवर सजावट करण्यासाठी याचा वापर केला जात होते.

गोंड आदिवासी समाजातील रूढी आणि परंपरा जीवनातील महत्त्वाचा भाग आहे. सण, विवाह पद्धती, धार्मिक विधी, पारंपरिक खेळ, गाणी, नृत्य आणि हस्तकला या प्रकाराचे पालन मोठ्या प्रमाण केले जात आहे. ज्यामुळे आधुनिकतेचा प्रभाव ही स्पष्टपणे दिसून येतो. शहरीकरण, औद्योगीकरण, शिक्षणाचा प्रसार, मोबाईल, इंटरनेटचा उपयोग या नवीन रोजगार आणि जीवनशैलीत बदलामुळे समाजातील परंपरेत सहभाग कमी होत असल्याचे दिसून येत आहे. सहभाग आणि भूमिका बदलत आहे त्यामुळे शिक्षणांनी आधुनिक रोजगारांच्या माध्यमातून लोककला हळूहळू हरवत असल्याचे निरक्षणातून आले आहे.

या परिणामांवरून असे दिसून येते की गोंड आदिवासी समाजात आधुनिकी संघर्ष सतत चालणारी प्रक्रिया आहे परंपरा टिकवण्यासाठी समाजाने अनेक अनेक बदल स्वीकारत आहे. उदा. शरीर भागांमध्ये पारंपरिक सणांचे आयोजन कमी गोंड आदिवासीं लोकांमध्ये किंवा बदलत्या स्वरूपात केली जाते त्यामुळे पारंपारिक जीवनशैली आधुनिक जीवनशैली जोडून घेतली जाते. युवा पिढीमध्ये शिक्षण व रोजगारांमध्ये आधुनिक जीवनशैलीचा प्रभाव अधिक दिसतो. त्यामुळे काही पारंपरिक कौशल्य, गीत गाणे, हस्तकला हरवत आहे. वयोवृद्ध पिढी आणि गोंड आदिवासीं समाजातील दोन पिढ्यांमध्ये संघर्ष किंवा मधुमेन निर्माण होतो. या संघर्षातून असे दिसून येते की गोंड समाज आपल्या संस्कृतीक ओळखीचे रक्षण करत असूनही आधुनिकतेच्या दबावासमोर बदलत स्वीकारत आहे. शासन समाजसेवा संस्था आणि शाळा या मार्फत सामाजिक प्रतिष्ठा वाढवणे आणि परंपरा व सांस्कृतिक वारसा टिकण्यासाठी कार्यक्रम राबवणे आवश्यक आहे.

या गोंड आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक संरक्षण आणि जीवनशैली संतुलन साधने ही एक दीर्घकाणे प्रक्रिया ज्यामुळे समाजातील सर्व घटनांचा सहभाग आवश्यक्य आहे. शोध दरम्यान केंद्रित गट चर्चा आणि मुलाखतीतून दिसून येत आहे. गोंड आदिवासीं समाज आधुनिकतेशी संतुलन साधण्यासाठी काही रुढीचे स्वरूप बदलत आहे. उदा. पारंपारिक सणाचे आयोजन कमी लोकसंख्येसह किंवा नवीन पद्धतीने केले जाते परंतु विवाह पद्धतीतील सामाजिक समारंभ विवाह विधी आणि धार्मिक विधी अशा काही प्रमाणात अजूनही परंपरा पद्धतीने चालू आहे.

या संशोधनात गोंड आदिवासींच्या रूढी, परंपरा सबंधित अधुनिकतेशी संघर्षाचा अभ्यास करण्यात आला असून त्यांचा आजच्या बदलत्या व्यवस्थेशी असलेले संबंध विशद करण्यात आलेला आहेत.

**निष्कर्ष**

गोंड आदिवासी समाजाचे पारंपरिक जीवनशैली आणि संस्कृती शतके जुने आहे. जी धार्मिक सामाजिक सांस्कृतिक आणि जीवनशैली संबंधित आहे त्यांच्या जीवनातील मुख्य घटक देवपूजा, निसर्गपूजा, पवित्र बंधनाचे संवर्धन पारंपारिक व ग्रामसभा, लोककला, नृत्य, संगीत, हस्तकला आणि पारंपारिक शेती व आहार हे सर्व घटक त्यांच्या सामाजिक ओळखीचा पाया आहे.

आजच्या काळात आधुनिकतेचा प्रभाव या पारंपरिक रूढीवर स्पष्ट दिसतो तसेच नवीन तंत्रज्ञान शिक्षण, औद्योगिकरण, शहरीकरण आणि जागतिकीकरणामुळे कला, शिल्पकला, पारंपारिक शेती, पूजा, सामाजिक पद्धती यांचा अभ्यास कमी झाला आहे. उदा. गोंडी भाषेचा वापर कमी केलेला आहे. पारंपारिक हस्तकला व्यावसायिक स्वरूपात गेली आहे. काही शहरी जीवनामुळे काही पारंपारिक सण विधी मर्यादित राबवले जात आहे. गोंड आदिवासी समाजात परंपरागत ओळखीला टिकून ठेवण्यासाठी संघर्ष होत आहे. आजही रूढी परंपरा कायम आहे. तसेच बदलत्या काळामध्ये अनुकूलन मागणी सुधारित झाली आहे. आधुनिक आधुनिकतेशी संघर्ष हा त्यांच्या सांस्कृतिक आणि बदलांचा एक सतत चालणारी प्रक्रिया सुरू आहे.

संशोधनात असे दिसते की गोंड आदिवासीं समाजाची संस्कृती आणि त्यांच्या रूढी, परंपरा जतन करतानाच शिक्षण आणि इतर आधुनिक सुविधांचा स्वीकार करणे. स्वतःच्या हक्काचे संरक्षण करणे आणि त्यांच्या उपजीविकेला पाठींबा देणे. त्यांच्या पारंपारिक संस्कृतीचे संवर्धन करतांना आधुनिक साधनांचा योग्य वापर करणे गरजेचे आहे कारण सांस्कृतिक वारसा टिकून राहील आणि सामाजिक एकात्मता जपली जाईल.

**संदर्भ सूची**


- Choudhary,S.N (2014). Changing Tribal Life in India: Impact of Modernization. New Delhi: Concept Publication. पृष्ठ क्र. 87-101
- Elwin Verrier (1947).The Muria and Their Ghotul. Oxford University Press. पृष्ठ क्र. 23-45
- Gawali.S.B. (2018) Gond Samaj: Parampara ani Badalte Vastu. Nagpur: Vidharbha Sahitya Singh पृष्ठ क्र. 120-122
- Inkless, Smith & Rowsto (1974). Becoming Modern: Individual Change in Six Developing Countries. Harvard University Press. पृष्ठ क्र. 33-37
- Ogburn (1922). Social Change with Respect To Culture and Original Nature पृष्ठ क्र. 200-206
- Park,R.E & Burgess, E.W. (1930) Indroction to the Science of Sociology. Chicago: University of Chicago Press. पृष्ठ क्र. 158-163
- Patil B. N. (2015) Bhartiya Adivasi Samaj ani sanskruti,: Pune Diamond Publication. पृष्ठ क्र. 102-118
- Singh Yogendra (1986). Modernization of India Traditional: A Sociological Analysis. Dilhi: Thomson Press. पृष्ठ क्र. 25-30 to 102-207
- Singh,K.S. (1993). People of India: National Seriesl on Kolkata Anthropological Survye of India. पृष्ठ क्र. 201-215
- Stuart Holl (1990). Cultural Identity and Diaspora. In J. Rutherford (Ed.), Indenty, Community, Cultural, Difference. London Lowernece & wishart. पृष्ठ क्र. 222-227